माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ९८१/२०१९**
**अपिलार्थी, श्री. अशोक दौलतराव मापारी,**
**मु. पिंपळखुटा, पो. वडगाव तेजन, ता. लोणार, जि. बुलढाणा**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत कार्यालय मातमाळ, पंचायत समिती लोणार, ता. लोणार, जि. बुलढाणा**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती लोणार, ता. लोणार, जि. बुलढाणा**

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०६.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित (प्रतिनिधी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित (प्रतिनिधी)**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.०१.२०१९ | निरंक | ११.०२.२०१९ | २७.०२.२०१९ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नूसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०३.०१.२०१९** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी “ (१) पंतप्रधान आवास योजनेसाठी आलेल्या अर्जदारांच्या यादीची झेरॉक्स, (२) २०१० ते २०१८ पर्यंत मंजुर झालेल्या व लाभ घेतलेल्या घरकुलाची यादी, (३) २००० ते २०१८ दरम्यानचया लेखापरिक्षण अहवालांच्या झेरॉक्स प्रती, (४)कॅशबुकच्या झेरॉक्स प्रती, (५) २००० ते २०१८ पर्यंत ग्रामसभेत घेतलेल्या ठरावाच्या झेरॉक्स प्रती, (६) करपट्टी भरलेल्या उमेदवारांच्या झेरॉक्स प्रती, (७) करपट्टी बाकी असलेल्या व्यक्तीची यादी, (८) २०१५-१८ दरम्यान कोणत्या दस्तऐवजाच्या आधारे जागेच्या नोंदी केल्या त्याच्या झेरॉक्स प्रती, (९) स्वयंप्रेरणेने घोषीत करावयाची माहिती, (१०) ग्रामपंचांयत कार्यालयात जन माहिती अधिकारी व माहिती अधिकार अधिनियम, २००५ चा फलक लावला नाही त्याची फलक न लावल्याची हस्तलिखीत किंवा संगणकीकृत माहिती (११) ग्रामपंचायत कार्यालयात दि.०१ जानेवारी २०१५ ते दि.०१ जानेवारी २०१८ पर्यंतच्या आवक जावक रजिष्टरच्या झेरॉक्स प्रती, (१२) पंतप्रधान आवास योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी असलेल्या निकषाची झेरॉक्स प्रती,” मागितलेली आहे. सदर माहिती अर्जानूसार जन माहिती अधिकारी यांनी विहीत मूदतीत अपीलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दिनांक ११.०२.२०१९ रोजी** कलम १९ (१) नूसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे “माहिती मिळाली नाही” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २७.०२.२०१९ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारीत केले.



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती सत्यमेव जयते

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नूसार आयोगाकडे **दिनांक ०८.०४.२०१९ रोजी** " माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक २७.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानूसार आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. किशोर भाग्यवंत व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. रविंद्र मापारी हे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलकर्ता श्री.मापारी यांनी दि.०३.०१.२०१९ रोजीच्या जोडपत्र अ नूसार वरील प्रमाणे माहिती मागितली असून, त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवतीने विहीत मुदतीत प्रतिसाद न देण्यात आल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.११.०२.२०१९ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर दि.२७.०२.२०१९ रोजी सुनावणी घेण्यात आली व अपिलकार्ता यांना कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती प्रदान केली असल्याचे आढळून येते. आज झालेल्या सुनावणीत अपिलकर्ता हे प्राधिकरणाचे कार्यालयात उपस्थित असून, द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यास हरकत नसल्याचे नमूद केले. ही बाब लक्षात घेता, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून अपील निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**(राहूल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २७.०६.२०२४**

जावक क्रमांक ६४५८ दिनांक 08 OCT 2024

निर्गमित केले
08 OCT 2024